दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

संदर्भ : मा.सं/जनसंपर्क/प्रेस नोट/६०

## भुसावळ विस्तारित वीज प्रकल्पात "जनरेटर स्टेटर" उभारणीचा टप्पा यशस्वी

भुसावळ येथील ५०० मेगावॅटच्या संच क्र. ४ या संचाच्या उभारणीतील एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. दि. २६ जुलै, २०१० रोजी सदर संचाच्या "जनरेटर स्टेटरची" यशस्वी उभारणी करण्यात आली. भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेडच्या हरिद्वार येथे या जनरेटर स्टेटरची निर्मिती करण्यात आली. हा जनरेटर स्टेटर भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेडच्या हरिद्वार येथील कारखान्यातून भुसावळ प्रकल्पात आणण्यात आला आहे. २६० मेट्रीक टन वजन आणि ८.८३ मीटर लांबीच्या या महाकाय जनरेटर स्टेटरला टर्बाईन फ्लोअरवरील जनरेटर फाऊंडेशन १७.५ मीटर उंचीवर असलेल्या विशाल क्षमतेच्या पोर्टल क्रेनद्वारे बसविण्याची यशस्वी कामगिरी महानिर्मिती कंपनीच्या अभियंते, तंत्रज्ञांनी बजावली. यानंतर येत्या काही दिवसांत सदर संचाची हायड्रॉलिक चाचणी नियोजित केली आहे.

याप्रसंगी महानिर्मितीचे श्री. आर.एच. गौर - मुख्य महाव्यवस्थापक (प्रकल्प), श्री. ए.आर. अग्रवाल - मुख्य महाव्यवस्थापक (स्थापत्य), श्री. पचारे - मुख्य महाव्यवस्थापक (सं. व सु.), श्री. पी.एस. चौधरी - महाव्यवस्थापक (प्रकल्प), श्री. देवतारे - महाव्यवस्थापक (स्थापत्य), श्री. डी.के. चव्हाण - अधीक्षक अभियंता (प्रकल्प), श्री. डी.बी. खोब्रागडे - अधीक्षक अभियंता (स्थापत्य), श्री. चंद्रागडे - अधीक्षक अभियंता (सं. व सु.), तसेच मेसर्स. भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेडचे श्री. श्रीधर (निवासी बांधकाम व्यवस्थापक) व त्यांची टीम आणि मेसर्स. टाटाचे श्री. विनोद पटेल (निवासी बांधकाम व्यवस्थापक) व त्यांची टीम यांची उपस्थिती प्रामुख्याने होती. या उभारणीत, टर्बो-जनरेटर कामाशी निगडीत सर्व अधिकारी व तंत्रज्ञांनी अथक परिश्रम घेतले.

सदर उद्दिष्ट पार केल्याबद्दल महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुब्रत रथो आणि श्री. चंद्रकांत थोटवे - संचालक (प्रकल्प), श्री. अरुण डवलेकर - कार्यकारी संचालक (प्रकल्प) यांनी सर्व संबंधितांचे अभिनंदन केले व प्रकल्पाच्या पुढील कार्यास अधिक गतिमान करण्याच्या दृष्टीने शुभेच्छा दिल्या.

---

दिनांक : २६/०७/२०१०.

प्रति,

**माननीय संपादक,**
**दैनिक**

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत तातडीने प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

जनसंपर्क अधिकारी